नियमीत दिवाणी दावा क्र. ४९८/२०१३ निशाणी क्र.१०२

वादीतर्फे साक्षीदार क्र.५ यांची साक्ष,

मी देवाच्या नावाने शपथ घेतो की, मी जे सांगेन ते सत्य असेल,

संपूर्ण सत्य असेल आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही.

माझे नाव : सचिन सुरेशराव धनपलवार,

माझे वय : ५३ वर्षे, धंदा : परिरक्षक भूमापक,

राहणार : देवणी, ता. देवणी, जि. लातूर.

**वादीतर्फे विधीज्ञ श्रीमती पी. बी. टाकळे यांच्यामार्फत साक्षिदाराचा सर तपास शपथेवर सुरु**

१. मी परिरक्षक भूमापक म्हणून उप अधिक्षक, भूमि अभिलेख, देवणी या कार्यालयात दिनांक २०.०९.२०२२ पासून आजपावेतो कार्यरत आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये साक्षकामी मला समन्स प्राप्त झाले आहे. या प्रकरणातील वाद मिळकतीची मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मी मोजणी केलेली आहे. त्यामध्ये मी पोट हिश्श्यांची देखील मोजणी केलेली आहे. मोजणीचा आदेश प्राप्त झाल्यानंतर मी यातील पक्षकारांना तसेच शेजारील धारकांना नोटीस पाठवून मोजणीचा दिनांक कळविला. त्याप्रमाणे दिनांक ०२.०८.२०१६ रोजी मी व माझ्यासोबत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, उदगीर असे जायमोक्यावर जावून स.क्र. ३१ ची पाहणी करून वादी, प्रतिवादी व शेजारील धारकांनी दाखविलेल्या वहिवाटीप्रमाणे चुना टाकून इटीएस मशीनद्वारे मोजणी केली.

२. सदर मोजणीनंतर मी उभय पक्षकार तसेच साक्षीदारांसमक्ष त्याचा सविस्तर पंचनामा तयार केला. आज रोजी मी सदर मुळ पंचनामा माझ्यासोबत आणलेला आहे. आता तो मला दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०३** देण्यात येत आहे. त्यानंतर मी कार्यालयात जावून त्याचा अभिलेखाप्रमाणे नकाशा तयार केला. आता तो मला दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर 'क' प्रतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१०४** देण्यात येत आहे.

३. माझ्या मोजणीअंती आमच्या असे निदर्शनास आले की, वादी वसंत किसनराव घोणशे यांच्या ताब्यात स.क्र. ३१/१/३ मध्ये केवळ ६६ आर असून आणखी १० गुंठे क्षेत्र नांदेड–बीदर रस्त्यामध्ये गेलेले आहे. म्हणजेच वादीच्या ताब्यात एकूण ७६

आर क्षेत्र असल्याचे दिसून आले. वादीच्या ७/१२ प्रमाणे त्यांची १ हे. ३७ आर क्षेत्र असल्याचे दिसून आले. माझ्या मोजणीअंती वादीच्या ताब्यात ६१ आर क्षेत्र कमी दिसून आले. सदर कमी असलेले क्षेत्र वाद मिळकतीच्या पुर्वेकडील धारक अशोक ज्ञानोबा मुळे यांच्या स.क्र. ३१/१/१ मध्ये १४ आर असल्याचे तसेच बाबु रामचंद्र मुळे यांच्याकडे १९ आर जास्तीचे असल्याचे दिसून आले. सदर कमी असलेले क्षेत्रापैकी वाद मिळकतीच्या दक्षिणेकडी धारक ज्ञानोबा बाबुराव मुळे यांच्या स.क्र. ३१/१/१ मध्ये २६ आर जास्तीचे असल्याचे दिसून आले. तसेच आणखी २ आर क्षेत्र नांदेड–बीदर रस्त्यात गेल्याचे दिसून आले.

४. स.क्र. ३१ चे आमच्या कार्यालयाला पोट हिस्से पडलेले नाहीत. परंतु जायमोक्यावरील वहिवाटीप्रमाणे तसेच उभय पक्षकार तसेच शेजाऱ्यांनी दर्शविलेल्या खुणांप्रमाणे मी मोजणी करून अहवाल दिलेला आहे. **नि.क्र. १०४** वरील नकाशामध्ये सदर अतिक्रमीत क्षेत्र केसरी रंगामध्ये दर्शविलेले आहे.

सर तपास संपला.

## प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. पाटील यांच्यामार्फत वा.सा.क्र.५ चा उलट तपास शपथेवर सुरु

५. मी उदगीर येथे निमताणदार म्हणून सन २०१५ ते २०२२ पर्यंत कार्यरत होतो. यातील वाद मिळकत मोजणीबाबत मला आमच्या कार्यालयाने आदेशित केले होते. सदर आदेशामध्ये मला गावाचे नाव, सर्वे क्रमांक, मो.र. क्रमांक वगैरे कळवून मोजणीबाबत आदेशित केले होते.

६. प्रत्यक्षात जायमोक्यावर जावून मोजणी करण्यापूर्वी संबंधित पक्षकार व शेजारील भूधारकांना नोटीसा पाठविल्या होत्या. सर्वे क्र.३१ च्या शेजारील सर्वे क्र. म्हणजेच २९, ३२, ३७ आणि ५८ यातील धारकांना मोजणीपूर्वी मी नोटीसा पाठविल्या होत्या. प्रत्यक्षात मोजणी करण्यापूर्वी मी जायमोक्यावर जावून स्थळ पाहणी केलेली आहे. मौजे सुकणी या गावात तुकडे जोड तुकडे बंदीची योजना राबविलेली नाही.

७. उदगीर–नांदेड रस्ता नेमका कोणत्या वर्षी झालेला आहे याबाबत माझ्याकडे अभिलेख नाही. सर्वे क्र.३१ मधील कोणत्या धारकाचे नेमके किती क्षेत्र सदर रस्त्यामध्ये गेले आहे याचा अभिलेख माझ्याकडे नाही. सर्वे क्र.३१ मधून नेमके किती क्षेत्र

सदर रस्त्यासाठी संपादित झाले आहे हे मी **नि.क्र.१०४** वरील नकाशामध्ये नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी यातील **नि.क्र.१०४** वरील नकाशा तयार करत असताना जायमोक्यावरील विद्युत खांब तसेच झाडे दर्शविलेले नाहीत. सर्वे क्र.३१ मधील सर्व घरांनी नेमके किती क्षेत्र व्यापले आहे हे मी मोजलेले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदर घरं ज्या क्षेत्रामध्ये आहेत ते क्षेत्र मी मोजलेले आहेत.

८. प्रतिवादी हे सदर मोजणीवेळी व पंचनाम्यावेळी जायमोक्यावर हजर होते; परंतु त्यांनी पंचनाम्यावर स्वाक्षरी करण्यास नकार देवून तेथून निघून गेले. परंतु तसा उल्लेख पंचनाम्यात नाही. सर्वे क्र.३१ चे टिपण बुक मी आज रोजी सोबत आणले आहे. परंतु त्याचे गुणाकार बुक व वासलेवार बुक मी सोबत आणलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी सोबत आणलेल्या संचिकेमधील कागदपत्रे घेवूनच मी मोजणीकामी जायमोक्यावर गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करत असताना सर्वे क्र.३१ चे गुणाकार बुक व वासलेवार बुक माझ्यासोबत नव्हते.

९. सर्वे क्र.३१ मधील अंतर्गत रस्ते मी प्रस्तुत नकाशामध्ये दर्शविलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्वे मॅन्युअल मधील तरतुदींचा अवलंब न करता केवळ वादीच्या सांगण्यावरून खोटी मोजणी केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वादीच्या सांगण्यावरून खोटी मोजणी करून खोटा पंचनामा व नकाशा तयार केला आहे.

उलट तपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2025.08.05 14:57:17 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : ०५.०८.२०२५

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
उदगीर